MHKO030052442026

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५०३/२०२६ मधील</u>**
**<u>नि.क्र. १ खालील आदेश</u>**

दुर्गेश शंकर जाधव
वि.
महाराष्ट्र सरकार तर्फे शाहुपूरी पोलीस ठाणे

प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदारचे कथन की, शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.९९५/२०२५ हा प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६० चे कलम ११(1)(h),(d), महाराष्ट्र प्राणी परिरक्षण कायदा, १९७६ चे कलम ५ B, ९ व मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १२५, महाराष्ट्र मोटार वाहन कायदा कलम १७७/१३०, १८४, १९२ तसेच भारतीय न्याय संहिताचे कलम ३(५) प्रमाणे प्रस्तुतचा अर्जदार म्हणजेच आरोपी दुर्गेश शंकर जाधव याच्या विरुध्द नोंदविण्यात आला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने चारचाकी वाहन एमएच–१०–एक्यू ०२६६ हे परत मिळण्यासाठी दाखल केला आहे.सदरच्या वाहनाचा इंजिन नंबर आणि चेसिस नंबर अर्जात नमूद केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, तपासासाठी सदरच्या जप्त केलेल्या वाहनाची आवश्यकता नाही.सदरचे वाहन अर्जदाराच्या रोजच्या वापरासाठी गरजेचे आहे. ते पोलिस ठाण्यात पडून राहिल्यास वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता आहे आणि तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल. अर्जदार आवश्यक ते बंधपत्र आणि जामीन देण्यास तयार आहे. तसेच न्यायालयाने सांगितलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वाहन परत मिळण्यासाठी दाखल केला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जामध्ये नि.क्र.६ वर ध्यान फौंडेशन च्या वतीने श्री. भगवान महावीर गोशाळा यांनी अर्जदाखल केला आहे आणि त्यामध्ये असे नमूद

केले आहे की, त्यांचा ट्रस्ट हा गायी, म्हैशी, बैल इ. जनावरांचे जतन आणि संरक्षण करतो. त्यांचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुतच्या गुन्हयात ७ बैल जप्त करण्यात आले आहेत. सदरचे बैल हे आरोपीने निष्काळजीपणे सदरच्या वाहनामध्ये भरलेले होते. त्यांच्या खाण्यापिण्याची किंवा औषधांची व्यवस्था आरोपीने केली नव्हती. आरोपीकडे बैल वाहतुक करण्याचा परवाना नव्हता. या प्राण्यांना क्रूर वागणूक देण्यात आलेली आहे आणि त्यांना कत्तल करण्यासाठी सदरच्या वाहनातून घेवून जात होता.

**५.** सदरचे ७ बैल या गोशाळेकडे त्यावर उपचार करण्यासाठी, काळजी घेण्यासाठी आणि संरक्षण करण्यासाठी दिलेले आहेत. त्याप्रमाणे गोशाळा त्यांची काळजी घेत आहे. आरोपीला म्हणजेच सदरच्या वाहनाच्या मालकाला सदरच्या जनावरांची काळजी घेण्यासाठी, औषधोपचारासाठी दररोज रुपये २००/– प्रत्येकी देण्यासाठी दिनांक ०३.०५.२०१८ रोजीचे भारतीय प्राणी कल्याण मंडळ आणि दिनांक ०२.०७.२०१९ रोजीचे महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ यांचे परिपत्रक आहे. त्याप्रमाणे सदरचा खर्च अर्जदाराने दयावा असा आदेश करण्याची मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

**६.** नि.क्र.९ वर अर्जदाराने वरील अर्जावर लेखी म्हणणे दाखल केले आहे आणि गोशाळेचे म्हणणे नाकारले आहे. प्रस्तुतचा गोशाळेचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी त्यामध्ये करण्यात आली आहे.

**७.** नि.क्र.४ वर तपासी अंमलदाराने लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये योग्य त्या अटी व शर्तीवर सदरचे वाहन अर्जदारास परत करण्यास हरकत नाही असे कथन केले आहे.

**८.** नि.क्र.५ वर सरकारी वकीलांनी लेखी महणणे दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, आरोपीने सदरच्या वाहनातून ७ बैलांची अवैधपणे व अत्यंतक्रूरपणे विनापरवाना वाहतूक केली आहे. त्यामुळे सदरच्या

गुन्ळयामध्ये वाहन जप्त करण्यात आले आहे. तपासामध्ये आणि पुराव्यासाठी सदरच्या वाहनाची आवश्यकता भासणार आहे. जनावरांच्या देखभालीचा खर्च दिला किंवा कसे हे तपासी अमलदारांच्या लेखी म्हणण्यामध्ये नाही. नियमानुसार सदरचा खर्च देण्याची जबाबदारी आरोपीची आहे. याच स्वरुपोच गुन्हे पुर्वी देखील आरोपीवर दाखल झालेले आहेत. अशाच गुन्हयासाठी पुन्हा वाहनाचा वापर करण्याची शक्यता आहे. सदरच वाहनाची विक्री आणि तबदिली होण्याची शक्यता आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**९.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. या पुर्वी देखील आरोपीवर याच प्रकारचे गुन्हे दाखल झालेले आहेत हे दाखविण्यासाठी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११५९/२०२४ मधील आदेश दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अर्जदाराचा अर्ज नाकारलेला आहे. प्रस्तुतचा गुन्हा देखील त्याच स्वरुपाचा आहे. प्रस्तुतच्या गुन्हयातील वाहन मात्र वेगळे आहे. जे ७ बैल गोशाळेच्या ताब्यात देण्यात आले आहेत त्याचा खर्च देण्याची जबाबदारी वर उल्लेख केलेल्या परिपत्रकांप्रमाणे आरोपी/अर्जदाराची आहे. परंतु सदरचा खर्च दिल्या संदर्भातील कोणताही उल्लेख तपासी अंमलदाराच्या लेखी म्हणण्यात केलेला नाही.

**१०.** प्रस्तुतच्या गुन्हयाचा तपास होवून खटला चालण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे गुन्हयात जप्त केलेले सदरचे वाहन पोलिस स्टेशनला पडून राहिले तर निश्चितच त्याचे नुकसान होणार आहे. परंतु सदरचे वाहन परत देण्यापुर्वी वर उल्लेख केलेल्या दोन्ही परिपत्रकानुसार प्रत्येक जनावरासाठी २००/– रुपये प्रती जनावर प्रती दिवस असा खर्च अर्जदार/आरोपीने गोशाळेस देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरची जनावरे गोशाळेच्या ताब्यात दिलेल्या तारखेपासून ते खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंतचा सदर खर्च अर्जदार/आरोपीने गोशाळेस दयावा असा आदेश देणे योग्य होईल. अज्रदार/आरोपीने सदरचा खर्च देण्यात कसूर केल्यास नियमाप्रमाणे सदरचा खर्च आरोपीकडून वसूल करण्यास गोशाळा पात्र असेल. सबब, काही अटी व शर्तीवर जप्त

वाहन अर्जदार/आरोपीला परत देणे योग्य होईल त्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे,

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) गु.र.नं.९९५/२०२५ चे तपासी अंमलदार, शाहुपूरी पोलीस स्टेशन यांनी जप्त केलेला मुद्देमाल –

| अ.क्र. | तपशिल | आजच्या बाजार भावाने रुपये |
|---|---|---|
| १. | एक माल वाहतुक पांढ-या रंगाची एमएच-१०-इक्यू-०२६६ या क्रमांकाची बोलेरो पिक अप तिचा चेसीस नं.MA1RE2TTKS6G33854 तिचा इंजिन नं. TTS4G14134 असा असलेली | १०,००,०००/- |
| | एकुण किंमत | १०,००,०००/- |

असा एकूण रक्कम रु.१०,००,०००/– चा मुद्देमाल अर्जदार यांना अंतरिम कब्जात रक्कम रु.१०,००,०००/– (रुपये दहा लाख फक्त) च्या सुपुर्तनाम्यावर खालील अटींवर द्यावा–

१) अर्जदार यांनी सदर जप्त मुद्देमाल हे कोणत्याही प्रकारे हस्तांतरित/विक्री करु नये किंवा नष्ट करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये.

२) अर्जदार यांनी सुपूर्तनामा तपासी अंमलदार यांच्याकडे समक्ष द्यावा.

३) या न्यायालयाने किंवा अन्य न्यायालयाने आदेश केल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावा.

४) तपासी अंमलदारने जप्त मुद्देमाल अर्जदारचे ताब्यात देताना त्याची सर्व बाजूंनी छायाचित्रे घ्यावीत, तसा पंचनामा करण्यात यावा. छायाचित्रे व सुपूर्तनामा दोषारोपपत्रासोबत दाखल करावा.

५) आरोपी/अर्जदाराने प्रती जनावर प्रती दिन २००/– रुपये जनावरे गोशाळेच्या ताब्यात दिल्याच्या तारखेपासून ते प्रस्तुतच्या अर्जाच्या निकाल तारखेपर्यंतची रक्कम गोशाळेस दयावी. सदरची रक्कम दिनांक १३.०८.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी गोशाळेत जमा करावी आणि

त्याची पावती जमा करुन घेवून तपासी अंमलदाराने वर उल्लेख केलेले जप्त वाहन अर्जदार/आरोपी यांना परत देण्यात यावे.

६) सदरची भविष्यातील रक्कम अर्जदार/आरोपीने खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यत प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत गोशाळेत जमा करावी व त्याची पावती तपास पुर्ण होईपर्यंत तपासी अंमलदाराकडे आणि त्यानंतर दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर न्यायालयात जमा करावी. अर्जदार/आरोपीने कसूर केल्यास नियमाप्रमाणे सदरची रक्कम अर्जदार/आरोपीकडून वसूल होवून मिळण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यास गोशाळा पात्र राहिल.

७) सदर ७ जप्त केलेल्या जनावरांचा ताबा गोशाळेकडे आहे तो अंतरिम ताबा खटल्याचा निकाल लागेपर्यंत गोशाळेकडे ठेवण्यात येतो.

८) सदरच्या जप्त केलेल्या वाहनाचा आरोपीने इतर कोणत्याही गुन्हयात भविष्यात वापर केल्यास बंधपत्रानुसार दिलेली १०,००,०००/- इतकी रक्कम जप्त करण्यात येईल व ती आरोपीने न्यायालयात जमा करावी.

९) सदर आदेशाची एक प्रत संबंधित तपासी अंमलदार यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.08.05 17:37:29 +0530

कोल्हापूर. (**एम. डी. कश्यप**)

दिनांक: ०५.०८.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.